# सोहोगी

(कलतीची वेळ. झोपडीच्या दारात सोहोगी उभी आहे. एकटक रस्त्याकडे पाहाते आहे.-काही वेळाने पुढे येते. कडेला थांबते. गगन येतो. अतिशय संतापलेला. ताडताड झोपडीत जातो आणि बाहेर येऊन तिच्या समोर उभा राहातो. ती त्यांच्या नजरेला नजर देत राहातें. त्याचा राग अनावर होतो. तो तिला धरतो, ढकलतो व बेदम मारू लागतो. ती कोसळते. अजून काहीच बोलत नाही. तो चिडून मारतच राहातो. सोहोगी कण्हायला लागते. )

गगन : सटवे ! भात चोरते, उठ ! तुला दाखवतो आज ! ऊठ. (तिला ओढतो, ती उठते व त्याच्याकडे पाहात राहाते) सगळा भात खाल्ला ! बोल.

बोल, चोरशील माझा भात ?

(सोहोगी गप्पच राहाते. गगत पुन्हा रागाने तिला ढकलतो, मारतो.)

गगन : घडली चांगली अद्दल ? चोरशील परत माझा भात ?

सोहोगी : हो चोरीन, चोरीन, एकदा नाही शंभरदा तुझ्या वाटणीचा भात खाईन !

गगन : काय म्हणतेस सटवे? परत खाशील माझा भात?

सोहोगी : खाईन, खाईन, नेहमी खाईन, आणि भात जर नाही मिळाला तर तुला पण...

गगन : ( चक्रावून ) सोहोगी, तुला आज काय अवदसा आठवलीय. अग, कालपासून अन्नाचा कण नाही आहे पोटात. ऊन रणरणत होतं. तू भात आणशील म्हणून वाट पाहात होतो शेतावर. कसतरी काम रेटत होतं. पण तुझा मुळी पत्ताच नाही. तडफडत घरी आलो, तर तू माझा भात...

सोहोगी : माझा भात, माझा भात...तूच उपाशी होतास का? दोन दिवसापासून खायला काही नाही. घरात होतं काय शिजवायला ? मूठभर तांदूळ आणले असेच मागून नि शिजवले. पोटात अशी आग पडली तसा घासभर भात मी खाल्ला, तुला न देता मी खाल्ला ...

गगन : बस आता वर्षभर उपाशी ! शेतभर भात उभंय. एक दाणा नाही आणला. माझं भात – पण त्याचा सहारा नाही. नंदीचे रखवालदार टपून आहेत. उद्या नंदी येईल मग हे खंडाचं, हे व्याजीचं, हे दुपटीच्या बोलीनं नेलेलं, हे दुर्गादेवीच्या पूजेच्या वेळचं–सगळं शेत कापून नेईल आणि वर दहा–वीस रुपये बाकी काढील! मग नंदीकडून पुन्हा आपणच पिकवलेलं भात खावटीला, उधार–उसनं मागून आणायचं ! हे असं किती चालायचं ? (थांबून) नाही आता असं नाही देणार. मी आधीच आपलं भात कापून आणणार. आटप लवकर, ते भांडं ठेव गहाण आणि मिळेल घेऊन ये. चार घास पोटात ढकलून शेतावर जायला लवकर. आटप उशीर होतोय मला. (सोहोगी गप्पच गगनकडे पाहाते. काहीच हालचाल करीत नाही तेव्हा)

गगन : (हाताशपणे) सोहोगी, तुला माहित आहे लवकर कापायलाच हवं. नाहीतर नंदी गुंड घेऊन येईल नि सारं भात कापून नेईल. मला शेतावर जायला हवं. थोडं पाणी तरी दे... (सोहोगी अजूनही गप्पच)

गगन : (कळवळून) आता सगळं बोंबललं. पण मी नाहीच सोडणार. मी पिकवलेलं भात नाहीच सोडणार मी भात कापीनच. नंदी येईल, त्याचे गुंड येतील पोलिस येतील. मला बडवतील. माझं डोकं फोडतील मी मरेन !

सोहोगी (उफाळून) : गप्प, गप्प, मरायचं काय म्हणता असलं बोलणं मी नाही ऐकून घेणार, थांब जरा...

(सोहोगी जाऊन पाणी घेऊन येते, गगन पाणी पितो व निघतो.)

सोहोगी : (निश्चयाने) मी येते घेऊन भात...

गगग : (आश्चर्याने) भात, पण कुठनं ?

सोहोगी : ते माझं मी पाहून घेईन. आज मी काहीही करून भात आणीन. उधार आणीन चोरून आणीन, बळेच आणीन पण उपाशी नाही राहाणार त्या नंदीच्या घरी मणच्या मण भातानं कोठड्या भर ल्यात, त्यातनं...

गगन : तो तुला बोट नाही लावू देणार भाताला.

सोहोगी : नाही दिला तर – –तर – – मी हिसकाऊन घेईन. आपण मरमर मरून भात पिकवायचं आणि नंदीनं ते सारं घशात घालयचं. खंडाच्या नावानं बळकावायचं. आपल्याला पोटभर भात तरी खायला नको ? मी नाही आता राहाणार उपाशी. आपण दिवसभर राबतो. आपल्या शेतात भात पिकवतो तो आपल्याला मिळालाच पाहिजे. मी भात मिळवणारच कसंही करून आणणार —गप नाही बसणार......
( सोहोगी त्वेषाने बोलत राहाते, सूर्याचे किरण सोहोगीच्या चेहऱ्यावर पडून तिचा चेहरा तेजाळलेला दिसतो. त्या चेहऱ्यात काहीतरी ज्वलंत दिसतं–संताप निग्रह. गगन सोहोगीकडे पहातो. प्रभावित होऊन मागे फिरतो व तिचा हात हातात घेतो.)

गगन : सोहोगी, माफ कर मला. मी परत तुझ्यावर हात नाही टाकणार. (एका बंगाली कथेवरून)